| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय<br>रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं. ०२२-२९४५१००१<br>Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in | |

प्रेसनोट क्रमांक :- ६८-२३ दिनांक :- ०१/०३/२०२३

## मेमसाब ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कामगिरी.

दिनांक २७.०२.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकास गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, मेमसाब ऑर्केस्ट्रा बार, गाळा नं.४५, तारासिंग कम्पाऊड, एम.एस हॉटेल, दहिसर नाका, पेणकपाडा रोड, काशिमीरा, ता.जि. ठाणे या बार आस्थापनेच्या हॉलमध्ये महिला सिंगरच्या नावाखाली परवाना नसतांना मुलींकडुन नृत्य करवुन घेत असुन सदर बारचे मालक/चालक, मॅनेजर कम कॅशिअर, पुरुष सिंगर, वादक व वेटर हे मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहीत करुन नृत्य करण्यात भाग पाडत आहेत.

मिळालेल्या माहीतीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक कक्षाचे पो.नि. श्री. समीर अहिररावा यांनी कायदेशीर बाबीची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक पाठवून सत्यता पडताळुन गाळा नं.४५, तारासिंग कम्पाऊड, एम.एस हॉटेल, दहिसर नाका, पेणकपाडा रोड, काशिमीरा, ता.जि. ठाणे या ठिकाणी पोलीस पथक व दोन पंचासह ००.१५ वा. छापा टाकला असता, मेमसाब ऑर्केस्ट्रा बार आस्थापनामध्ये हिंदी गाण्याच्या व वाद्याच्या तालावरती महिला सिंगर अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच ऑर्केस्ट्रा बारचे चालक, मॅनेजर कम कॅशियर, सब मॅनेजर, वेटर, पुरुष सिंगर व वादक हे बारमधील महिला सिंगर यांना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करीत असताना मिळुन आल्याने रोख रक्कम व चित्रीकरण केलेली क्लीप जप्त करुन नमुद ऑर्केस्ट्रा बार आस्थापनेचे चालक ०१, मॅनेजर कम कॅशिअर ०१, हॉल मॅनेजर ०१, वेटर ०२, पुरुष सिंगर १ व वादक ०१ असे एकुण ०७ इसमांना ताब्यात घेण्यात आले, तसेच पाहिजे आरोपी मालक अब्दुलकरीम मुनीर अहमद शेख, रा. काशिमिरा, पुर्ण पत्ता माहित नाही व तपासात निष्पन्न होणारे इतर चालक यांच्याविरुध्द स.फौ. विजय चन्नाप्पा निलंगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमिरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. १५०/२०२३, महाराष्ट्र हॉटेल, उपगृहे आणि मद्यपान कक्ष(बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणा-या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ चे कलम ३, ८ (१) (२) प्रमाणे दि.२८.०२.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, विजय निलंगे, पो.अंम. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, महिला पो.अंम.अश्विनी भिलारे, महिला म.सु.ब. सोनाली मोरे सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी केली आहे.